Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# स्वामी विवेकानंदाचा स्त्री विषयक दृष्टीकोण

**प्रा.डॉ बाबासाहेब पाबळे**
कला, वाणिज्य, व विज्ञान
महाविद्यालय, अकुंशनगर

**प्रस्तावना :—**

स्वामी विवेकानंदांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जाबाबतचे चिंतन केले आहे. वैदिक काळी स्त्रियांचे, जीवन सन्मानाचे होते आणि त्यांचा सामाजिक दर्जाही चांगला होता. परंतू मध्ययुगीन काळात स्त्रियांना हीन दर्जा प्राप्त झाला असे मनुस्मृतीवरुन व गीतेवरुनही दिसते. गीतेने स्त्री व शूद्रांना एकाच पंगतीत बसविले होते. मनूने मनुस्मृतीत स्त्रियांना स्वातंर्त्य कधीही देऊ नये असे सांगितले आहे. स्त्रीला जन्मभर स्वातंर्त्य आणि मनमोकळेपणे वर्तन करण्याची संधीच नव्हती. स्त्री जातीचे सामाजिक स्वातंर्त्य नष्ट होऊन त्यांना चार भिंतीच्या आत राहावे लागेल. स्त्रीयांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. स्वामी विवेकानंदांच्या विविध विचारांमध्ये एक प्रकारची दिशा दिसते. त्यांच्या सामाजिक विचारांचा विचारकरतांना स्त्री ला विवेकानंदांनी राष्ट्राच्या आणि समाजाच्या विकासाचा आधारस्तंभ मानले आहे. भारतीय समाजाला समाज रथाची दोन चाके म्हणजे स्त्री—पुरुष दोन्ही चाके समर्थ असणे स्वाभाविक आहे. स्त्री ला समतेच्या तत्वानुसार पुरुषांच्या बरोबरीने वाटचाल करण्याची संधी तिला मिळणे आवश्यक आहे. परंतू जन्मापासून मृत्युपर्यंत तिला अनेक रुढींच्या अमानुष बंधनात जखडलेले आहे. ह्मघ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असतांना मात्र स्त्रीने स्वत:चा एक ठसा, स्वत:चे एक वेगळे व्यक्तीमत्व घडविण्याचा खुपच प्रयत्न केलेला आहे. म्हणून विवेकानंद म्हणतात उष:काल होतो आहे, तो नव्या विचारांचा आणि आचारांचा आणि म्हणून म्हटले जाते की, स्त्री शक्ति उद्याच्या जीवनातील आशादीप आहे. म्हणून स्वत:मध्ये असलेल्या शक्तिची जाणीव तिला झाली आहे. म्हणून भारतीय समाजातच नव्हे तर, जगभरात सर्व स्त्रीया शारिरीक व मानसिक, बौध्दीक सामाजिक दृष्ठ्य अधिक सक्षम झाल्या आहेत.

**संशोधनाचा उद्देश :—**

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने विवेकानंदांचा स्त्री विषयक दृष्टीकोण विषयक, त्यांचा आजच्या जगामध्ये असलेल्या स्थानाचा आणि उन्नतीच्या दिशेने चालेल्या प्रयत्नांच्या विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला असून त्या विषयासंबंधीची माहिती, संदर्भ ग्रंथ व इतर साहित्यांची मदत घेवून प्राप्त माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

**भारतीय स्त्री बद्दलचे विवेकानंदांचे विचार :—**

भारतीय स्त्रीयांचा पुराण काळापासून विचार केला तर असे लक्षात येते की, भारतीय स्त्रीला वेद काळातपुरुषा इतकेच स्वातंर्त्य व अधिकार प्राप्त होते. यज्ञोपवित आणि उपनयनाचा अधिकार स्त्रीयांना होता. शिक्षण वर्नानुसार नव्हे तर गरजेनुसार दिले जात होते.

कोणत्याही स्त्रीला कोणत्याही विषयाचे अध्ययन, शस्त्र धारण करण्याचा अधिकार होता. ही स्वातंत्र्याची भावना असल्यामुळेच मैत्रेयी, गार्गी या सारख्या स्त्रीया त्या काळी तज्ञ म्हणून नावाजलेल्या होत्या. त्यांनीही स्वातंर्त्य ग्रंथ रचना केलेली आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात, या सीता—सावित्रीच्या देशात या पुण्यक्षेत्राच्या भारतात अद्यापही श्रीयांचे चारित्र्य, सेवाभाव, स्नेह, संतुष्टवृत्ती आणि भक्ती हे गुण जसे पहावयास मिळतात तसे पृथ्वीवर कोठेही दिसत नाही. पाश्चिमात्य देशात स्त्रीयांना पाहून मला पुष्कळदा त्या स्त्रीया आहेत असे वाटत नसे. त्या हुबेहूब पुरुषच वाटतात, भारतीय स्त्रीयांमध्ये नम्रता, विनयशिलता पाहून डोळे तृप्त होतात म्हणून त्यांना स्त्री शिक्षण मिळाल्यानेच त्या आदर्श नारी होऊ शकतील. स्वामी विवेकानंदांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य अशा दोन्ही जगातील समाज जीवनाचा व विशेषता: स्त्री जीवनाचा जवळून अभ्यास केला होता. त्यामुळे कदाचीत भारतीय श्री च्या पावित्र्याविषयी पारंपारीक मूल्ये व भारतीय कौटुंबीक जीवन यावर त्यांची पुर्ण श्रध्दा होती. समकालीन भारतातील स्त्रीची वाईट अवस्था व श्री—पुरुषातील विषमभाव याबाबतीत ते अत्यंत दु:खी होते. म्हणून विवेकानंद म्हणतात, भारतीय स्त्री इतर कोणत्याही देशातील स्त्री इतकीच आपले प्रश्न सोडविण्यास समर्थ आहे.

'यत्र नार्यस्तु न पुज्यन्ते तत्र देवता'

जेथे स्त्रीयांचा सन्मान होतो तेथेच देवता रमतात जे असे करीत नाहीत त्यांची सर्व कर्म निळतात. प्रत्येक अमेरीकन स्त्री लक्षावाधी हिंदू स्त्रीया पेक्षा अधिक शिक्षित आहे. आमच्या स्त्रीया असे शिक्षण का येत नाहीत, स्त्रीयांना आदर्शाची वागणूक का मिळत नाही. अशा विविध प्रश्नांच्या पाठीमागे भारतामध्ये स्त्रीया बद्दलचा संकुचित दृष्टीकोण आहे. परंतू भारतीय समाजामध्ये स्त्रीयांना पूजनीय स्थान आहे.'

**<u>मातृपदाचे श्रेष्ठतत्व :—</u>**

विवेकानंद म्हणतात, भारतीय स्त्रीयापूढे असणाऱ्या आदर्शात मातृत्वाचा आदर्श सर्वश्रेष्ठ आहे. पत्नी पदापेक्षाही मातृपदाचे श्रेष्ठत्व वेगळे आहे. मातेकडून आपल्या पुत्रांना योग्य तो आदर्श वाटतो. मातृपदच जगातील सर्व पदात श्रेष्ठ आहे. कारण तेथेच सर्वात अधिक निस्वार्थपणे शिक्षण मिळण्याची व कार्यकरण्याची संधी लाभू शकते.

**<u>स्त्रियाबद्दल आदरयुक्त दृष्टीकोण :—</u>**

प्रत्येक स्त्री बद्दल आपल्या मनात मातृभाव असायला हवा. आपल्या विवाहित पत्नी व्यतिरिक्त अन्य सर्व स्त्रीयांकडे पुरुषाने माता,कन्या, भगिणी अशा भावनेनेच पहायला हवे. विवेकानंदांनी भारतीय परंपरेचे सार समजावून सांगतांना मांडलेला दुवा अत्यंत महत्वाचा आहे. पाश्चिमात्य देशातील स्त्री पुजन म्हणून जे आम्ही ऐकतो ते सामान्यता स्त्री सौंदर्याची व तिच्या यौवनांची पुजन होय. पण श्रीरामकृष्णांच्या दृष्टीने स्त्री पूजा म्हणजे स्त्रीची आनंदमयी जगदंबा या रुपाने केलेली पूजा होय. सावित्रीचा आदर्श सतीत्वासाठी भारतीय कन्यांपूढे ठेवला जातो.

**<u>स्त्री मठाची उभारणी :—</u>**

विवेकानंद म्हणतात, गंगेच्या त्या पलीकडील काठावर खुप मोठी जमीन घ्यावी व तेथे अविवाहीत व विधवा ब्रम्हचरणी यांची राहण्याची व्यवस्था राहील ग्रस्थघराच्या श्रध्दा संपन्न व भक्तीमान स्त्रीयां तेथे येऊन ..राहतील. या मठाशी पुरुषांचा काहीही संबंध राहणार नाही. पुरुषांच्या मठातील वयोवृध्द साधु दुरुनच या स्त्री मठाला मार्गदर्शन करतील, या श्री मठामध्ये स्त्रियांसाठी धर्मशास्त्र, साहित्य, संस्कृत, इंग्रजीचेही शिक्षण दिले जाईल. आणि संपूर्ण स्त्री शिक्षण स्त्रियांसाठी स्त्री शिक्षण केंद्रे निर्माण करण्यात येतील.

**स्त्री शिक्षणाची आवश्यकता :—**

शिक्षण ही ठरावीक लोकांची मक्तेदारी नाही. याचा विवेकानंदांनी पाठपुरावा केला. शिक्षण मिळाले पाहिजे. स्त्रीयांना शिक्षण देणे आवश्यक आहे. विवेकानंदांच्या मते, पुरुषांच्या शिक्षणाची जशी उघडविण्यात येतात तशी स्त्रीयांच्या शिक्षणासाठी 'स्त्री शिक्षण केंद्र' उघडविण्यात यावीत. या केंद्रातील शिक्षणाचा भार घेतील त्यामध्ये पुराण, इतिहास, ग्रहकृत्ये, कला, साहित्य, कौटुंबीक जीवनातील कर्तव्य, आदर्शचारित्र्य घडविण्याला सहाय्यक असणारे निती नियम आधुनिक विज्ञानाच्या मदतीने शिकवयास हवेत. '' धर्मपरायनतानितीपरायनता विद्यार्थीनीच्या अंगी बानावयास हवे. त्या सुगृहिणी होतील. आणि स्त्रीयांची उन्नती होईल. केवळ कार्यभार टाकून प्रश्न सुटणार नाहीत तर त्यांचे हक्क व कर्तव्याची जाणीव सुध्दा समाजाला झाली असे विवेकानंद सांगतात.

**सारांश :—**

विवेकानंदांनी प्राचीन काळापासून आरंभ करुन आधुनिक काळापर्यंतच्या स्त्री जीवनाचे चित्रण केले तसेच भारतीय स्त्रीचे जीवन कसे असेल, याचे चित्रण स्त्री विषयक दृष्टीकोणात केले आहे. विवेकानंदांना स्त्रीच्या बलस्थानाची मर्यादांची कल्पना होती. बदलत्या काळानुसार स्त्रीयांनी पाश्चात्य शिक्षण घ्यावे. त्याच भारतीय जीवनमूल्ये ही स्विकारावीत असे आग्रहाने सांगितले आहे. गार्गी, मैत्रे, मुद्रा या सारख्या तेजस्वी स्त्रीया द्य पुन्हा वर्तमान काळात निर्माण होऊन इतिहासाची पुनरावृत्ती होईल असा प्रभळ विश्वास विवेकानंदांनी विषयक दृष्टीकोणात प्रकट केला आहे. त्यांनी पाश्चिमात्य व भारतीय स्त्रीची केलेली तुलना अत्यंत महत्वाची एकंदरीत स्वामी विवेकानंद हे हिंदू समाजाचे एक धार्मिक नेते असून ही त्यांची स्त्री विषयक दृष्टी इतर धर्म सनातनी, स्त्री विरोधी नाही. उलट ते पुरोगामी आधुनिक दृष्टीने स्त्रीयांच्या उन्नतीसाठी अनिष्ट प्रथांवर कडाडून करतात. त्यांचे हे स्व:उध्दाराचे विचार विसाव्या शतकातील स्त्रीला प्रेरणादायी व मौलिक ठरतील.

**निष्कर्ष :—**

१. विवेकानंदांनी वेदकालीन स्त्री शिक्षणाचे महत्व व मध्ययुगीन काळातील स्त्रियांचे व आधुनिक काळात शिक्षणात झालेली क्रांती यावर त्यांनी संखोल चिंतन केलेले आहे.

२. स्वामी विवेकानंदांच्या विचारांमध्ये स्त्री—पुरुषांना समान स्थान देण्यात आले असून स्त्री शक्ती ही आहे. स्त्रियांशिवाय कुटूंब पूर्ण होऊ शकत नाही. त्यावर समाजाचे अधिष्ठाण अवलंबून आहे. हे त्यांनी ओळखले होते.

३. नंतरच्या काळामध्ये स्त्रियांची धार्मिक दृष्टीकोनातून पधोनती झाली असली तरी स्वामी विवेकानंदांनी स्त्रियांना धार्मिकदृष्ट्य महत्वाचे स्थान प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न केले.

४. भारतीय स्त्रियांना शिक्षण दिले तर त्याही समाजात असा बदल घडवून आणतील असे विवेकानंद स्पष्ट करतात.

५. स्त्रियांना शीलाची व चारित्र्याची यासाठी आवश्यकता आहे की, स्त्रिया घरदाराचा त्याग करुन तेथे राहतील म्हणून विवेकानंदांनी भारतीय स्त्रियांना चारित्र्य निर्मिती व शीलावर विशेष लक्ष केंद्रीत पाहिजे असे ते सांगतात.

**संदर्भ सुचि :—**

१. स्वामी विवेकानंद, भारतीय नारी, रामकृष्ण मठ, नागपूर, (१६६७) पृ.क्र. ४०.
२. आलका वाडकर, स्त्रीशक्ती प्रबलीकरण, शिक्षण संक्रमण, पुणे. २००५) पृ.क्र. ३.
३. डॉ. काचोळे दा. धो. — भारतीय राजकीय विचारवंत, किर्ती प्रकाशन (१६६५) पृ.क्र. १४.
४. स्वामी विवेकानंद, भारतीय नारी, रा.म. नागपूर, पृ.क्र. ४.
५. कुंडले म.जा., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, पुणे. पू.क्र. ११२
६. डॉ. करंदीकर सुरेश, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ.क्र. १६
७. रविंद्रनाथ टागोर, शिक्षण संक्रमण, शिक्षण मंडळ, पुणे. पृ.क्र. ३१
८. स्वामी विवेकानंद, शिक्षण, रामकृष्ण, मठ, नागपूर. पू.क्र. ३६
९. पोतदार वसंत, योध्दा संन्याशी, राजहंस प्रकाशन, पुणे. पू.क्र. ४२